२

दिनांक-२९/१०/२०१५ रोजी मा.जिल्हाधिकारी रत्नागिरी यांचे अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय कोस्टल झोन मॉनेटरींग समितीची सभा व टास्क फोर्स समितीची सभा आयोजीत करणेत आली होती त्या सभेचे इतिवृत्त

सदर सभेस खालीलप्रमाणे अधिकारी उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १. मा.जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| २. मा. अप्पर जिल्हाधिकारी | सदस्य |
| ३. निवासी उपजिल्हाधिकारी रत्नागिरी | सदस्य सचिव |
| ४. उपविभागीय अधिकारी रत्नागिरी | सदस्य |
| ५. नगर रचनाकार रत्नागिरी | सदस्य |
| ६. उपअधिक्षक भुमी अभिलेख अधि.गुहागर | सदस्य |
| ७. उपअधिक्षक भुमी अभिलेख अधि.रत्नागिरी | सदस्य |
| ८. तहसीलदार मंडणगड | सदस्य |
| ९. तहसीलदारदापोली | सदस्य |
| १०. तहसीलदार खेड | सदस्य |
| ११. तहसीलदार चिपळूण | सदस्य |
| १२. तहसीलदार गुहागर | सदस्य |
| १३. तहसीलदारसंगमेश्वर | सदस्य |
| १४. तहसीलदार रत्नागिरी | सदस्य |
| १५. तहसीलदार लांजा | सदस्य |
| १६. तहसीलदार राजापुर | सदस्य |

---

मा. अध्यक्ष महोदयांनी उपस्थितांचे स्वागत करुन बैठकीबाबत प्रस्तावित केले.

मा. अध्यक्ष महोदयांनी सीआरझेड नोटीफिकेशन ६.१.२०१५ नुसार सीआरझेड क्षेत्रात कोणत्याही बांधकामास पर्यावरण विभागाची पूर्व परवानगी (MCZMA) प्राधिकरणाकडुन घेणे आवश्यक आहे अशा सुचना दिल्या.

उपविभागीय अधिकारी चिपळूण यांजकडील पत्र क्र.एनएनए/सीआरझेड/अंजनवेल/२०१५ दिनांक-०८/०९/२०१५ अन्वये प्राप्त तक्रार श्री अनिल अनंत खडपेकर रा. अंजनवेल यांनी बिननंबरी गावठाणामध्ये १०.९० X ५.८० मी लांबी रुंदीचे चौथ-याचे बांधकाम केले आहे. तसेच श्री खडपेकर यांनी केलेले बांधकाम समुद्रांच्या उच्चतम भरती रेषेपासुन ९ मी.अंतरावर आहे. तसेच सदर चौथ-याचे बांधकामालगत असलेले सार्वजनिक संडास हे समुद्राच्या उच्चतम भरती रेषेपासुन ७ मी. अंतरावर आहे. सदरची दोन्ही बांधकामे हि सीआरझेड नियमांचे उल्लंघन केले प्रकरणी मा. अध्यक्ष महोदयांनी चर्चा करुन सदर प्रकरणी उपविभागीय अधिकारी चिपळूण यांनी पर्यावरण संरक्षण अधिनीयम १९८६ च्या कलम ५ अन्वये सीआरझेड नियमानुसार कार्यवाही करण्याबाबतच्या सुचना दिली.

तसेच तहसिलदार रत्नागिरी यांचेकडुन प्राप्त पत्र क्रमांक/जबाबी १/सीआरझेड बांधकाम/२०१५ दिनांक-०९/०९/२०१५ अन्वये प्राप्त तक्रार श्री दिलावर दाऊद गावखडकर रा. पेठपुर्णगड ता.जि. रत्नागिरी यांनी मौजे पेठपुर्णगड येथील स.न. ९ हि.न. १ हि मिळकत श्री सुरेश शांताराम पाथरे यांचे दाखल आहे. सदरची मिळकत समुद्रांचे लगत आहे. सदर मिळकतीमध्ये श्री दिलावर दाऊद गावखडकर यांनी चौथऱ्याचे बांधकाम केले असुन, सदरचे बांधकामामुळे सीआरझेड नियमांचा भंग करुन अनधिकृत बांधकाम केलेल्या प्रकरणी मा. अध्यक्ष महोदयांनी चर्चा करुन सदर प्रकरणी उपविभागीय अधिकारी

रत्नागिरी यांनी पर्यावरण संरक्षण अधिनीयम १९८६ च्या कलम ५ अन्वये सीआरझेड नियमांनुसार योग्य ती कार्यवाही करणेबाबत सुचना दिली.

सीआरझेड क्षेत्रामध्ये अनधिकृत बांधकामे आहे किंवा कसे ? याबाबत सर्व्हेक्षण करुन पथकप्रमुख, उपविभागीय अधिकारी (सर्व) यांनी आपला अहवाल त्वरीत या कार्यालयास सादर करणेबाबतच्या सुचना मा. अध्यक्ष महोदय यांनी दिल्या.

वरीलप्रमाणे सुचना देऊन उपस्थितांचे आभार मानुन बैठक संपल्याचे जाहिर केले.

क्र.मह/कार्या-१३/सभा-१०/२०१५
जिल्हाधिकारी कार्यालय,रत्नागिरी
दिनांक-२९/१०/२०१५

स्थळप्रत मा. जिल्हाधिकारी
यांचे सहिची आहे.

जिल्हाधिकारी रत्नागिरी करीता

प्रत- १) मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट ॲथॉरिटी , पर्यावरण विभाग , नविन प्रशासन, नलभवन,मादाम कामा रोड, मंत्रालय, मुंबई ४०० ०३० यांजकडे माहितीसाठी सविनय सादर.

२) सर्व सदस्य यांना माहितीसाठी व जरुर त्या कार्यवाहीसाठी.

03 NOV 2015
पाठविले
कार्यनिशी लिपिक